राज्यातील आदिवासी सहकारी सूत गिरण्यांना भागभांडवल मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : आविम-२०९६/प्र.क्र.१४३/का.३
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १४ ऑक्टोबर, १९९८.

वाचा :- १] शासन निर्णय, सहकार व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक सूतगि-२१९३/ प्र.क्र.१८६/टेक्स्-१, दिनांक ११.८.९३

२] शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक बीयुडी-२०९८/ प्र.क्र.१९ अ/का.६, दिनांक १२.५.९८.

शासन निर्णय :- आठव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीपर्यन्त महाराष्ट्र राज्यात दोन आदिवासी सहकारी सूत गिरण्यांना शासनाने मान्यता दिलेली आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासी सहकारी सूतगिरण्यांना शासकीय भागभांडवल देण्यासाठी सन १९९८-९९ मध्ये अर्थसंकल्पात तरतूद करण्याकरिता मार्च-१९९८ च्या विधीमंडळाच्या अधिवेशनात रु.४.०० कोटी इतक्या रकमेचा नवीन बाब भाग-१ चा प्रस्ताव सादर करण्यात आला. विधानमंडळाने महाराष्ट्र विनियोजन अधिनियम, १९९८ [१९९८ चा अधिनियम क्र.१५] अन्वये, नवीन बाब भाग-१ चा प्रस्ताव मंजूर केला आहे. त्याप्रमाणे संदर्भाधिन शासनाचे दिनांक १२ मे, १९९८ च्या आदेशानुसार रु.४.०० कोटी एवढी तरतूद "नियंत्रक अधिकारी" म्हणून सहनिबंधक, सहकारी संस्था [आदिवासी विकास], नाशिक यांच्या अधिनस्त ठेवण्यात आली आहे.

२. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासी सहकारी सूत गिरण्यांना भागभांडवल देण्यासाठी शासन पुढीलप्रमाणे कार्यपध्दती विहित करीत आहे :-

[१] आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासी सहकारी सूत गिरणीस प्रत्येकी २५,००० चात्यांचा सूत गिरणीसाठी कर्ज व भागभांडवलाचे प्रमाण १:१ ठेवून १:९ या प्रमाणात भागभांडवल पुरविण्यात यावे.

[२] आदिवासी सहकारी सूतगिरणी, आदिवासी उपयोजना क्षेत्रात असावी.

[३] सूतगिरणीचा अध्यक्ष व उपाध्यक्ष [चेअरमन व व्हाईस चेअरमन] आदिवासी असावा.

[४] आदिवासी सहकारी सूतगिरणीचे ८० टक्के सभासद आदिवासी असावेत व

...२/-

२० टक्के सभासद बिगर आदिवासी असावेत. तसेच आदिवासी सहकारी सूतगिरणीच्या संचालक मंडळावर ८० टक्के सभासद आदिवासी असावेत व २० टक्के सभासद बिगर आदिवासी असावेत. त्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य सहकारी कायद्यानुसार सहकारी सूतगिरणीच्या पोट नियमामध्ये तशी तरतूद करण्यात यावी.

[५] आदिवासी सहकारी सूतगिरणीने प्रथम आदिवासींकडून शेअर्स घ्यावेत व त्यानंतर बिगर आदिवासींकडून शेअर्स घ्यावेत. आदिवासी सहकारी सूतगिरणीचे शेअर्स कमीत कमी रू. १०.०० लाख [सध्याच्या प्रकल्प किंमतीच्या $\frac{१}{१०}$ याप्रमाणानुसार] असावेत.

[६] आदिवासी सहकारी सूतगिरणीस आठव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीमध्ये मंजूरी देण्यात आली असावी.

[७] आदिवासी सहकारी सूतगिरणीस १:९ या प्रमाणात भाग-भांडवल देतांना, सूतगिरणीने प्राथमिक कार्यवाही [उदा. प्रत्येक सभासदाकडून जमा केलेले भाग-भांडवल, जमीन संपादनासाठी केलेली कार्यवाही, वास्तुशास्त्रज्ञाची केलेली नियुक्ती इ.] केलेली असावी. शासनाने दिलेले भाग-भांडवल सूतगिरणीच्या आस्थापनेवर खर्च करण्यात येऊ नये. आदिवासी सहकारी सूतगिरणीस मंजूर झालेले शासकीय भाग-भांडवलाची रक्कम, संचालक हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर व संबंधीत गिरणीच्या नावे, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक/राष्ट्रीयकृत बँक/सहकारी बँक यांच्या शाखेत संयुक्त खाते उघडून जमा करावी.

[८] शासन निर्णय, सहकार व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक सूतगि-११९०/१५७७४/प्र.क्र. २७६/टेक्स-१, दिनांक १.६.१९९२ अन्वये नमूद केलेल्या तसेच, शासकीय भागभांडवलासाठी शासनाने भविष्यात आणखी काही अटी व शर्ती विहित केल्यास अशा अतिरिक्त अटी व शर्तींच्या अधिन राहून शासनामार्फत देण्यात येणारे भाग-भांडवल परतावा किंवा त्यावरील डिव्हीडंट शासनास ५ वर्षानंतर प्राप्त होण्यास प्रारंभ होण्याबाबतच्या योजनेच्या अधिन राहून मंजूर करण्यात यावा.

[९] गिरणीला आणखी शासकीय भागभांडवल मंजूर करण्यापूर्वी सध्याच्या गिरणीच्या प्रकल्प खर्चास शासनाची मान्यता मिळविणे आवश्यक आहे.

[१०] संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी गिरणीचा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी करावा लागणारा खर्च लक्षात घेऊन या खर्चानुसार आवश्यक रक्कम गिरणीस मंजूर करावी. तसेच, मंजूर केलेल्या रक्कमेच्या संदर्भात गिरणीच्या संचालक मंडळाने गिरणीच्या खर्चावर कडक नियंत्रण ठेवावे व अनावश्यक खर्च टाळावा.

...३/-

३. सभासदांनी गोळा करावयाच्या एकूण भाग-भांडवलापैकी किमान ५० टक्के भाग-भांडवल आदिवासी सहकारी सूतगिरणीने जमा केल्यावरच देय शासकीय भाग-भांडवल मंजूर करण्यात यावे.

४. आदिवासी सहकारी सूतगिरणीने भाग-भांडवल मंजूरीचा प्रस्ताव संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्याकडे सादर करावा संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग, नागपूर यांनी संबंधित सूतगिरणीचा अर्ज त्यांच्या शिफारशीसह शासनाकडे सादर करावा. अशी शिफारस सादर करताना सदर सूतगिरणीने प्रकल्प उभारण्याच्या बाबतीत केलेली प्रगती नमूद करावी.

५. आदिवासी सहकारी सूतगिरणीच्या संचालक मंडळावर शासन नियुक्त संचालकाची तरतूद संस्थेच्या पोटनियमामध्ये असणे आवश्यक राहील.

६. आदिवासी उपयोजना क्षेत्रा अंतर्गत आदिवासी सहकारी सूतगिरण्यांना त्यांचे प्रकल्प उभारण्यासाठी भाग-भांडवल रूपाने अर्थसहाय्य देण्यासाठी होणारा खर्च "मुख्य लेखाशिर्ष-४२२५,-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याणावरील भांडवली खर्च-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-जनजाती क्षेत्र उपयोजना-०२ अनुसूचित जमातीचे कल्याण-१०८-इतर सहकारी संस्थामधील गुंतवणूक, [२] सहकारी संस्था-मधील भांडवली गुंतवणूक [ए] राज्य योजनांतर्गत योजना, [४२२५-०२४७] मागणी क्रमांक टि-९" खाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

७. हा शासन निर्णय, सहकार व वस्त्रोद्योग विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक प्र.क्र.७२०/९८/व्यय-११, दिनांक ९.१०.१९९८ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ ज. ल. पावरा ]
कार्यासन अधिकारी

प्रति,

सह निबंधक सहकारी संस्था, आदिवासी विकास, नाशिक.
सहकार आयुक्त, व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

...४/-

e/ 9



संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर.
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, धुळे, जिल्हा धुळे.
महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
सहकार व वस्त्रोद्योग विभाग [टेक्स-१], मंत्रालय, मुंबई-३२.
वित्त विभाग [व्यय-११], मंत्रालय, मुंबई-३२.
अवर सचिव [का. ६], आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
कक्ष अधिकारी [का. ७], आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
अध्यक्ष, दिनदयाळ सहकारी सूतगिरणी मर्या. उदयनगर [पिंपळनेर] ता. साक्री, जि. धुळे
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/नागपूर/अमरावती.
प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, [सर्व]
जिल्हाधिकारी, धुळे, जिल्हा धुळे.

कार्यकारी संचालक, ऑल इंडिया फेडरेशन ऑफ को-ऑप-स्पीनींग मिल १४,
मर्झबान रोड, दुसरा मजला, मुंबई-१.
सह व्यवस्थापक, महाराष्ट्र स्टेट स्पीनींग मिल फेडरेशन लि. वकील हाऊस बेलार्ड इस्टेट, मुंबई.